# आंबेडकरवादी कवयित्रींच्या काव्यातील प्रेमविषयक जाणिवा

**प्रा. दिनेश गुजर**
शरदचंद्र महाविद्यालय, बुटीबोरी,
ता. जि. नागपूर—४४११०८
९८९०५८६०७७
dineshgujar51@gmail.com

**सारांश :—**

सामाजिक जाणिवेतूनच आंबेडकरवादी कविता जन्माला आली. अस्पृश्यांवरील अन्याय अत्याचाराच्या दाहकतेतून प्रखर विद्रोह धारण करीत अत्यंत नाविण्यपूर्ण रितीने ही कविता आकाराला आली. गावकुसाबाहेरील भयान काळोख आणि विदीर्ण करणारी चातुर्वर्ण्य व्यवस्थेची अमानुषता यांच्या कोंडीत जीव गुदमरुन टाकणारी गुलामी दलितांनी उद्ध्वस्त करीत अराजकतेचे साखळदंड खाड्खाड् तोडून टाकले. अशा विषमतेच्या दलदलीला नाकारत स्वत:च्या अस्मितेच्या लढाईसाठी अस्पृश्यवर्ग सतत लढत राहिला आणि जगण्याची अघोरी कोंडी फोडीत राहिला. त्याला एक शस्त्र सापडले. शब्दांचे, लेखनीचे शस्त्र! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सम्यक दृष्टीकोन अंगीकारत असंख्य कवी, लेखकांनी अत्यंत निर्भीडपणे आपल्या शब्दांना शस्त्र करीत अन्यायाविरूद्ध लिहिले. अशा या लिहित्या वर्गात स्त्रीयाही मागे राहिल्या नाहीत.

भारतात सतीप्रथा, केशवपन, बालविवाह, अंधश्रद्धा अशा असंख्य चालरिती होत्या. स्त्रीयांना शिक्षण घेता येत नव्हते. तिला खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य नव्हते. ती परावलंबी होती. ती सर्वस्वी पुरुषांवरच अवलंबून असायची म्हणूनच ती नाडल्या गेली होती. पिळल्या गेली होती. तिला स्वत:चे अस्तित्व नव्हते. असे हे एकूणच स्त्रीजातीचे दु:ख होते. दलित स्त्रीच्या वाट्याला याहून भयानक परिस्थिती आली होती. ती गरीबीचे चटके खात गरिबीशी लढता लढता प्रस्थापित विषम व्यवस्थेशीही लढत होती. ज्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने ती शिकली त्यावेळी आपल्यावरील अन्याय अत्यंत तीव्रतेने ती मांडू लागली. समाजातील दु:खाला ती वाचा फोडू लागली. अन्न, वस्त्र, निवारा आणि अस्मितेबद्दल ती व्यवस्थेला जाब विचारु लागली.

आंबेडकरवादी कवयित्रींचा अभ्यास करतांना मल्लिका अमरशेख, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, सुगंधा शेंडे, प्रज्ञा दया पवार, सुरेखा भगत, विमल गाडेकर, कुमुद पावडे, सुरेखा भगत, आशा थोरात, उषा हिंगोणेकर, अपर्णा लांजेवार, सरिता सातारडे, माया वासनिक, सुनंदा बोदिले, अहिल्या रंगारी, शशिकला कांबळे, कुंदा गायकवाड, मीना गजभिये, शैला गजभिये, प्रतिभा गेडाम, लता जाधव अशा अनेक कवयित्रींच्या कविता मनाला भावतात.

समाजातील दु:ख, दैन्य, दारिद्र्यासोबतच भारतीय परंपरेत गाडल्या गेलेल्या अमानुष चालीरितीविरुद्ध ती बोलत राहिली. आणि अशातच एखादवेळेस तिच्या मनात प्रेमाचे स्फुलिंग जागे होत गेले; मात्र तिच्या प्रेमविषयक जाणिवेत जाती, धर्म, वर्ग आणि वर्णाच्या अघोऱ्या चालीरिती येत गेल्या. ती मग त्याविरुद्ध लिहित राहिली. आपले प्रेम व्यक्त करीत राहिली.

प्रस्तुत शोधनिबंधात काही आंबेडकरवादी कवयित्रींच्या प्रेमकवितांचा संक्षिप्त आढावा घेण्यात येणार आहे.

**प्रस्तावना :—**

आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितांचा अभ्यास करीत असताना आपल्याला असे दिसून येते की, त्यांच्या कविता ह्या स्त्रीयांच्या वाट्याला आलेल्या अपमानीत जीवनातून जन्माला आल्या आहेत. तद्वतच अस्पृश्य म्हणून जीवन जगत असताना गावकुसाबाहेरच्या भयानकतेचे अनुभव आणि अनुभूतीतून त्यांचा अविष्कार झाल्याचे दिसून येते. प्रेम हा अत्यंत नाजूक असा विषय पण दलित स्त्री ज्या घुसमटीत आणि दारिद्र्यात जीवन जगत होती, त्यातून बाहेर पडायला तिला वेळच नव्हता. आंतरजातीय विवाहाचे तिला बंधन पडत असतील पण दलित /अस्पृश्य स्त्री, सवर्ण किंवा स्पृश्य समुदायात स्वीकारली जाईल का? या प्रश्नाने ती असंख्य वेळा गर्भगळीत झाली असेल. अशा पार्श्वभूमीवर तिने जर प्रेमकविता लिहिली तर त्यातील जाणिवा या निश्चितच वेगळ्या राहतील. त्या प्रस्थापित कवयित्रींच्या प्रेमकवितेपेक्षा भिन्न राहतील; हे निश्चित!

आंबेडकरवादी कवयित्रींच्या दु:खाचा परीघ फार मोठा आहे. त्याला अनेक आयाम आहेत. तिलाही मन आहे, हृदय आहे. मात्र ते सर्व ऐरणीला टांगून जगावे लागते. म्हणूनच तिच्या प्रेमकवितेत परंपरागत प्रेमकवितेपेक्षा वेगळा भाव प्रकटताना दिसतो. अनेक कवयित्रींनी प्रेम कविता लिहिल्या आहेत. त्यातील ज्योती लांजेवार, शशिकला कांबळे, कुंदा गायकवाड, मीना गजभिये, हिरा बनसोडे, शैला गजभिये, सुरेखा भगत, प्रतिभा गेडाम आणि लता जाधव यांच्या कवितेतील प्रेमविषयक जाणिवा अनेकांगी दृष्टीने विलक्षण रितीने पाहावयास मिळतात.

**आंबेडकरवादी प्रेमकविता : एक दृष्टिक्षेप :—**

आंबेडकरवादाने समताधिष्टित संस्कृतीचा पुरस्कार केला आहे. गुलामीकडून स्वातंत्र्याकडे जाणारा हा प्रवास भारतीय समाजव्यवस्थेचा चेहरा बदलविणारा असा आहे. काही आंबेडकरवादी कवयित्रींच्या प्रेमविषयक कवितांचा परामर्श घेऊन त्यातून त्यांच्या संवेदना आणि भावभावनांचा आढावा घेत त्यांच्या काव्यविष्काराचे स्वरुप आणि भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

डॉ. ज्योती लांजेवार ह्या आंबेडकरवादी काव्यप्रवासातील अत्यंत महत्वपूर्ण कवयित्री आहेत. त्यांना सारे आभाळ आपलेच वाटते. परंतु तसे नसते आपली जखम मांडतांना, पाठ फिरविणाऱ्या प्रियकराविषयी सांगताना त्या उद्विग्नतेने म्हणतात,

“.......... मला कळतंय अंधारातही
काळोखून गेले तुझे मनोरे
तूच सांग कोठून आणू प्रकाश
त्याने तर माझ्याकडे पाठच फिरवली
असं करु या का दोघेही आपण
जखमांचं चांदणं पिऊन पचवित बसण्यापेक्षा
दगडं होऊन
कोसळू यात उदंड दऱ्या खोऱ्यात ” १

‘जखमांचं चांदणं पिऊन पचवित बसण्यापेक्षा दगडं होऊ यात’ या प्रतिमेतून मनाचा निर्धार कणखरपणे आणि व्यवस्थेची मुर्वत न करता बेफिकिरपणे आपला मनस्वीपणा त्या प्रकट करतात. उदंड दऱ्या खोऱ्यात कोसळण्याची आत्मविश्वासूवृत्ती कवितेत निराशा न पेरता उदंड आशावाद पेरताना दिसते.

प्रियकराविषयी त्यांच्या मनात विलक्षण प्रेम आहे. 'तिला स्पर्श हवा आहे, तुझ्या निशिगंधात एका क्षणाचा' या दुसऱ्या एका कवितेतील ओळीतून तिच्या निर्व्याज्य मनाचा ठाव घेता येतो. प्रियकराची अनामिक ओढ त्यांच्या कवितेतून पाहावयास मिळते.

शशिकला कांबळे यांनीही आपल्या कवितेतून आपल्या प्रेमविषयक जाणिवा मांडल्या आहेत. त्याही अत्यंत निर्भीडपणे आपले प्रेम व्यक्त करतात. त्या म्हणतात....

"तुझ्या पापण्यांच्या कमानीतून
मी आत जाताना
अनेकांनी पाहिलं असेल
त्याची मला पर्वा नाही.
तू मला मात्र परतवू नकोस" २

यातील आर्जवी सूर तिच्या पवित्र प्रेमाची साक्ष देणारा आहे. तिच्या प्रेमात कितीही अडथळे आले असले तरी त्या अत्यंत सामर्थ्याने अडथळ्यावर मात करु पाहतात.

मोठ्या आश्वासक भूमिकेतून तटस्थतेने आपल्या मनाची कठोरता आणि भूमिकाही सांगताना शेवटी त्या प्रियकराला म्हणतात,

"प्रत्येक रात्र उसवलेली उसासते
रानपाखरांच्या कंठातील उदासगाणे बनते, आणि
तुझी अनिवार्य ओढ
मला क्षयासारखी कुरतडत राहते." ३

उदासिनतेत रमतानाही कवयित्रीला प्रियकराची अपार ओढ आहे. प्रियकर हाच तिच्यासाठी अनिवार्य विषय झाला आहे. त्याच्या ओढीशिवाय तिला दुसरे–तिसरे काही दिसत नाही. तिचे असे हे निष्कलंकित प्रेम अतूट असे आहे.

आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेत प्रियकराविषयीच्या धरसोडपणा दिसत नाही. त्या आपल्या प्रेमाशी एकनिष्ठ आहेत. प्रियकराशी प्रामाणिक आहेत. कुंदा गायकवाड यांच्याही कवितेत असाच प्रामाणिकपणा दिसतो. बिनधास्तपणा दिसतो. "यायचेच असेल तुला तर ह्या क्षणी येऊन जा/ उजाडण्यापूर्वीच्या धूसर प्रकाशात कदाचित तुला माझ्या घराची वाट सापडेल." अशी आशावादी वृत्ती पेरणाऱ्या या कवितेत स्त्री मनाची भावावस्था कवयित्री अत्यंत तरलतेने अधोरेखित करते. या कवितेत ती विद्रोही होते. बंडखोरही होते. व्यवस्थेने तिच्या मार्गात जी विघ्ने पेरली आहेत. त्याने ती बेचैन होते. पण खंबीर राहते. अत्यंत विद्रोहाने ती म्हणते.

".....वांझोट्या वंशावळी रक्तामासांच्या पुतळ्यांच्या
बेचैन करतात माझ्या अस्मितेला
उसवून टाकायाच्यात या
परंपरेच्या मरणार्त यातना
जीवन मरणाची वजाबाकी करणाऱ्या
म्हणूनच सांगतोय
यायचेच असेल तुला तर येऊन जा

सूर्य माझ्या डोळाभर होण्याआधी" ४

इथे कवयित्रीचा कोंडमारा जाणवतो. व्यवस्थेची चाललेला तिचा संघर्षही इथे स्पष्ट दिसतो. तिचा पराकोटीचा आशावाद वांझोट्या संस्कृतीला चेतविणारा आहे. तिच्या स्वप्नांना उभारी देणारा आहे. मीना गजभिये यांच्या कवितेत निराशा जरी डोकावत असली तरी एक निश्चित निर्धार आहे. ती प्रियकराची आस लावून बसली आहे. मात्र मनासारखे घडत नसल्याचे बघून ती प्रियकराला काही सांगताना म्हणते.,

"बहराने माझी सगळी पानं
लुटून नेलीत
आता उरल्यात फांद्या आणि काटे
पुन्हा एकदा येऊन जा
काटे ठेवून फांद्या घेऊन जा"५

अशीच काहीशी अवस्था बनसोडे यांचीही झाल्याची दिसते. तिला दु:खातून प्रियकर सोडून गेल्याने तिचे दु:ख अंत:करण हेलावून टाकते. जातीव्यवस्था आणि चातुर्वर्ण्य व्यवस्थेतून त्यांच्यात एक विलक्षण दरी निर्माण झाली आहे. ताटातूट झाली आहे. तिच्या मनाची झालेली अवस्था मांडताना ती म्हणते.

"तुझ्या आठवणीचे दिवे लावताना
काळजाला चटके बसतात
माझ्या अपमानीत प्रेमाच्या क्रुद्ध ज्वाला
भस्मसात करतात तरल स्वप्नांच्या कोवळ्या चंद्रवेली
तुझ्या प्रीतीच्या थेंबभर सुखासाठी
डोंगरभर दु:ख मी साहतच राहीले
त्या उथळ बेगडी थेंबसुखात
कशी बरे मी बेसाबध वहात गेले?"६

असे जिवापाड प्रेम असणारे नातेसंबंध प्रियकराने तोडून टाकल्यानंतर प्रेयसीची झालेली घालमेल चिरंतन दु:ख देऊन गेली. त्या दु:खाचे विदीर्ण करणारे अनुभव अत्यंत हळव्या पद्धतीने कवयित्रीने रेखाटले आहे. 'तू मातीचे चांदणे माझ्या आकाशभर' या प्रतिमेतून तिच्या पवित्र प्रेमाची साक्ष पटते. अशीच काहीशी उदासिनता सुरेखा भगत यांच्या कवितेतही पाहायला मिळते. त्या म्हणतात,

"शब्द नाही अर्थ नाही
हरवलेली आशा मी
रंग नाही गंध नाही
साच्यात ओतलेली मी
मैफल तर आता केव्हाच उठून गेली.
मी ही आता जाते आहे
माझ्यासाठी तू का ओढून घ्यावेस रे मरण
माझ्या गझलांचे तू का व्हावे कारण?"७

आपल्यामुळे आपल्या प्रियकराला कशाला त्रास व्हावा? या हेतूनेच स्वत: कवयित्री आपल्या प्रियकराला नीट समजून घेताना दिसते.

साचेबंद आयुष्याने तिच्या जीवनाला पार रंगहीन, गंधहीन करुन टाकले आहे. प्रतिभा गेडाम यांच्या कवितेतील अस्वस्थता विलक्षण आहे. प्रेमातील अडसराचे कारण सांगताना प्रतीकात्मकरितीने त्या म्हणतात,

"तू न्याहाळीत होतास
चंदेरी दुनिया आणि मी सुद्धा
फरक एवढाच की
तू कफल्लक होतास प्रामाणिक
मी शुद्ध पांढरेपेशी होते
आगंतूक प्रामाणिक राज्यकर्त्यासारखी
सारे हाती नसूनही असल्यासारखी"[८]

अशी भ्रमसदृश्यता तरल आणि हळुवारपणे जेव्हा कवितेत येते; त्यावेळी लाक्षणिक अर्थाने नवा आशय कवितेत भरते. लता जाधव तर आपल्या प्रियकराला निर्वाणीचा इशारा देऊन जातात. जाधव म्हणतात,

"आकाशात फडफडणाऱ्या पक्ष्यांचे
संदर्भ पुन्हा उकरु नकोस
माझ्या स्तब्ध वास्तूपासून निघणारा राजरस्ता
आता काटेरी बनलास
तू उभा राहा तसाच अविचल हिमालयासारखा
मी मार्ग संक्रमीत आहे रक्ताळलेल्या पावलांनी."[९]

या कवितेतील प्रेयसी स्वाभीमानी आहे, कणखर आहे. ती दुबळी नाही. तिला लाचारी मान्य नाही. आपल्या सोडून गेलेल्या प्रियकरासाठी तिने आपला मार्गच आता काटेरी बनवला आहे. अशा अस्मितादर्शी व्यक्तिरेखा आपल्याला आंबेडकरी कवितेमध्ये पाहायला मिळतात.

**समारोप :—**

आंबेडकरवादी कवयित्रीच्या कविता पुरुषी वर्चस्वाला, त्याच्या अहंकाराला नाकारीत आपली अस्मिता शाबून ठेवण्याचा प्रयत्न करताना दिसते. आंबेडकरवादी कवयित्री केवळ आपल्याच जातीच्या पुरुषांवर प्रेम करीत नाही तर ती इतर सवर्ण किंवा स्पृश्य जातीच्या पुरुषावरही प्रेम करते. तिला दगा देणारा पुरुष तिच्या जातीचाही आहे आणि जातीबाहेरील जातीचा आहे. मुद्दा जातीचा नाही. प्रेमाला तशीही जात नसते. प्रेम हे आंधळे असते. जाती, धर्म तिला दिसतंच नाही. फक्त ती प्रेमाची भाषा जाणते. आणि एकमेकाला समजून घेत आयुष्यभर सोबत राहण्याच्या आणाभाका घेते. कवयित्री ही इतर सामान्यच स्त्री सारखी असते. प्रेम करायचा तिलाही तेवढाच अधिकार असतो. नव्हे प्रेम तर ही नकळत होऊन गेलेली बाब असते. प्रेम करणे हा गुन्हा असेल तर तो कळत—नकळत तिच्याही हातून झालेला असतो.

प्रेम हा अत्यंत नाजूक विषय आहे. आंबेडकरी जाणिवेतून काव्यलेखन करणाऱ्या कवयित्रींनी प्रेमकविता लिहितानाही आपली जाणीव आणि भूमिका कायम ठेवली आहे. भूमिकेशी ती तडजोड करताना

दिसत नाही. अनोख्या प्रतिमातून आपले हळवेपण तिने कवितेतून व्यक्त केले आहे. प्रेमाचा नाजूक धागा गुंफताना तिने कलात्मकता आणून कवितेत सौंदर्य ओतले आहे.

**निष्कर्ष :—**

१. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतील प्रेमविषयक जाणिवा ह्या प्रस्थापित मराठी कवयित्रींच्या, उच्चवर्णीय, उच्चभ्रू स्त्री जातीच्या जाणिंवाहून निश्चितच वेगळ्या आहेत.
२. चातुर्वर्ण्य व्यवस्था, वर्ग वर्णवादाच्या चक्रव्युहात गुरफटलेली त्यांची कविता ठसठसणाऱ्या जखमा आणि ठणकणारे मेंदू देऊन प्रकटते.
३. आंबेडकरवादी स्त्री ही समंजस, प्रौढ आणि विलक्षण स्वाभिमानी असून आंबेडकर, बुद्धांच्या प्रेरणेतूनच ती आपल्या जीवनाकडे पाहताना दिसते.
४. निर्भीड, परखडवृत्ती आणि स्पष्टवक्तेपणा ठसठसशीतपणे त्यांच्या कवितातून डोकावते.

**संदर्भ टिपा :—**

१. संपादक — शरणकुमार लिंबाळे, 'दलित प्रेमकविता' प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, ऑक्टोबर १९८६, पृष्ठ —४३
२. तत्रैव, पृ. ५९
३. तत्रैव, पृ. ६०
४. तत्रैव, पृ. ६८
५. तत्रैव, पृ. ७८
६. तत्रैव, पृ. ७९
७. तत्रैव, पृ. ८२
८. तत्रैव, पृ. ८२,८३
९. तत्रैव, पृ. ८३